**Dainik Herald, Wednesday 17 July 2019**

# मये येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**साखळी, दि. १७ (प्रतिनिधी) :**

भारत हा कृषिप्रदान देश आहे. गोव्यात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. पण काही ठिकाणी शेतकऱ्यांनी शेतीकडे पाठ फिरवली आहे. शेतीचे नवे तंत्रज्ञान वापरूनही अनेक शेतकरी शेती करतात. शेतीविषयी नवीन तंत्रज्ञान शिकविण्यासाठी सुळकर्णे येथील डॉन बॉस्को कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरतर्फे विद्यार्थ्यांचा एक गट आपल्या ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत कार्य करत आहे. सेंद्रिय खत वापरावर त्यांनी जास्त भर दिला आहे.सेंद्रिय शेती ही खूप महत्त्वाची असल्याने ते हे कार्य करीत आहेत. मये तिखाजण येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारा कार्यक्रम नुकताच यावेळी घेण्यात आला.

शेतीला अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव होतो व उत्पन्न कमी येते तर कधी कधी येताच नाही. त्यामुळे रोग नियंत्रणावर शेतकऱ्यांना त्यांनी



**मये : तिखाजन येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉन बॉस्को कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरचे विद्यार्थी.**

मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मिठाच्या पाण्यात (३ टक्के) बिया घालून त्यामध्ये तरंगलेल्या बिया रोगाच्या असतात. त्या वापरायच्या नसतात व खाली राहिलेल्या लावण्यासाठी वापरायच्या, असे सांगितले.

तसेच दापोग नर्सरी कशी करायची, त्याचे फायदे सांगितले. यामध्ये त्यांनी शेतीची परत लावणी करता येते, १४ ते १५ दिवसांनी रोप लावणी करायला तयार होते, जागा जास्त लागत नाही, सुरक्षित राहते, असे सांगितले.

मये तिखाजण या भागात ही प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना दाखविली. या विद्यार्थ्यांमध्ये सलोनी पाटील, असिल्दा वाझ, पूजा फडते, प्रतिभा मिशाळ, प्रीती वेळीप, आशु कुमारी यांचा समावेश होता.